# राजर्षी शाहू छत्रपती

## जीवन व शिक्षणकार्य

प्राचार्य रा. तु. भगत

रिया पब्लिकेशन्स्

**राजर्षी शाहू छत्रपती** जीवन व शिक्षणकार्य **: प्राचार्य रा. तु. भगत**

© **प्राचार्य रा. तु. भगत**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**आवृत्ती**
ऑक्टोबर, २०११

**किंमत**
रुपये ३१०/-

# राजर्षी शाहू छत्रपती

## जीवन व शिक्षणकार्य

*महाराष्ट्रभर शिक्षणप्रसार करून*
*बहुजन समाजाला शिक्षणाच्या*
*संजीवनीने समर्थ आणि संपन्न करणारे*
*राजर्षी शाहू महाराजांचे शिष्योत्तम*
***डॉ. पंजाबराव देशमुख***
*आणि*
***कर्मवीर भाऊराव पाटील***
*यांना सादर समर्पण.*

# पुरस्कार

बहुजन समाजाचे महाराष्ट्रातील पहिले उद्धारक म. फुले यांनी आपल्या 'शेतकऱ्याचा आसूड' या ग्रंथात विद्याहीन, दरिद्री व अज्ञानी बहुजन समाजाच्या हीनदीन अवस्थेची मोजक्याच शब्दांत मीमांसा केलेली होती. ते म्हणाले होते–

'विद्येविना मती गेली।<br>
मतीविना नीती गेली।।<br>
नीतीविना गती गेली।<br>
गतीविना वित्त गेले।।<br>
वित्ताविना शूद्र खचले।<br>
इतके अनर्थ एका अविद्येने केले।।'

१९ व्या शतकातील बहुजन समाज म्हणजे शूद्रातिशूद्रांचा समाज. यामध्ये उच्चवर्णीय ब्राह्मण सोडून मराठ्यांसह सर्व मोडत होते. मराठे स्वत:ला क्षत्रिय मानत असले तरी ब्राह्मण त्यांना 'शूद्रच' समजत होते. त्यांच्याशिवाय माळी, साळी, कुंभार, लोहारादी जाती या तर शूद्रच गणल्या गेल्या होत्या. त्याखाली महार, मांग, चांभार, ढोर इ. अतिशूद्र जाती मानल्या गेल्या. असा हा समाज म्हणजे देशातील ९७ टक्के समाज सामाजिक गुलामगिरी, धार्मिक गुलामगिरी, दारिद्र्य, अज्ञान व अंधश्रद्धा यांच्या गर्तेत पडला होता. त्याच्या या अवस्थेचे मूळ कारण एकच होते. ते म्हणजे 'अविद्या'. शिक्षणाचा अभाव!

या शिक्षणाच्या अभावामुळेच शूद्रातिशूद्रांचा समाज शेकडो वर्षे विद्याहीन, धनहीन व सत्ताहीन राहिला होता. याच्या मुळाशी हिंदुस्थानातील वर्णव्यवस्था होती.

या व्यवस्थेत ब्राह्मण वर्णाच्या हाती विद्येची मक्तेदारी होती, परिणामी समाजात तोच वर्ण अथवा वर्ग विद्यासंपन्न, धनसंपन्न आणि सत्तासंपन्न होऊन राहिला होता.

१८१८ साली पेशवाई संपली आणि इंग्रजांची राजवट आली. इंग्रजी साम्राज्यवादाबरोबर इंग्रजी शासनद्धती, न्यायपद्धती, कायदे आणि शिक्षणही आले. कायद्यासमोर सर्व समान, सर्वांना एकच न्याय, हे तत्त्व त्यांनी स्वीकारले. या तत्त्वानुसार शिक्षणाची म्हणजे विद्येची द्वारे सर्वांना खुली झाली. म्हणजे ब्राह्मणांची विद्येवरची मक्तेदारी संपली. हिंदुस्थानात हे प्रथमत:च घडत होते. ब्राह्मणांच्या मक्तेदारीला इंग्रजांनी शह दिला होता.

पण हे सर्व तत्त्वत: होते. म्हणजे या तत्त्वाची प्रत्यक्ष व्यवहारात अंमलबजावणी झाली नाही. म्हणजे तशी ती व्हावी अशी खुद्द मायबाप इंग्रज सरकारचीच इच्छा नव्हती. स्वाभाविकच ही गोष्ट ब्राह्मण वर्गाच्या पथ्यावरच पडली. त्यांची विद्येवरची मक्तेदारी पूर्वीसारखीच अबाधित राहिली.

इंग्रज सरकारने लॉर्ड मेकॉलेचा 'झिरपणीचा सिद्धांत' स्वीकारला होता. प्रथम शिक्षणाची सुविधा वरच्या वर्गाला उपलब्ध करून द्यावी, म्हणजे ब्राह्मण वर्गाला द्यावी, मग हे शिक्षण यथावकाश हळूहळू झिरपत खालच्या वर्गात जाईल; असे राज्यकर्त्यांचे म्हणणे होते. पण ब्राह्मणांनी शिक्षणाचे झरे वरच्या वरच अडविले, त्यांचे पाझर खालच्या थरांपर्यंत पोहोचूच शकले नाहीत. या थरांतील शूद्रातिशूद्र तृषार्तच राहिले.

म. जोतिराव फुले हे या अन्यायी व्यवस्थेच्या विरोधात उभे राहणारे पहिले कृतिशील नेते होते. त्यांनी देशातील शूद्रातिशूद्रांच्या वतीने १८८२ साली त्यांच्या मुलाबाळांसाठी हंटर कमिशनसमोर सक्तीच्या व मोफत शिक्षणाची मागणी केली. पण सरकार त्यांना बधले नाही. सरकार उच्च शिक्षणासाठी काही सुविधा उत्पन्न करीत होते. कारण त्यातून तयार होणारे 'आंग्लविद्याविभूषित' तरूण सरकारला प्रशासनात 'कारकून' म्हणून हवे होते. सरकारची ती प्रशासनिक गरज होती. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करून सरकारला काय मिळणार होते? उलट करोडो रुपये खर्च होऊन शूद्रातिशूद्र शहाणे होणार होते; आणि ही गोष्ट त्यांना भविष्यात धोकादायक वाटत होती. ३ टक्के लोक शहाणे झाले तरी ते शासकीय नोकऱ्यांत अडकून मानसिक गुलामीत व लाचारीत राहणार होते. पण हे ९७ टक्के शूद्रातिशूद्र शहाणे झाले तर? भविष्यातील हा धोका इंग्रज सरकारला 'शहाणा' बनवत होता. १९ व्या शतकात शिक्षणाच्या क्षेत्रातील हा सर्वांत मोठा बिकट प्रश्न होता आणि सरकारला हा प्रश्न सोडविण्याची इच्छाच नव्हती.

म. फुल्यांनी हा प्रश्न सोडविण्याचा आपल्या परीने प्रयत्न केला. शूद्रातिशूद्रांच्या मुलांसाठीच नव्हे तर मुलींच्यासाठीही त्यांनी प्राथमिक शाळा काढल्या पण त्यांच्या प्रयत्नांना साधनांच्या मर्यादा होत्या. त्यांच्याजवळ ना होती संपत्ती, ना होती सत्ता. तरीही त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत केलेले कार्य हे एका महान क्रांतीचे उगमस्थान ठरले!

शूद्रातिशूद्रांच्या प्राथमिक शिक्षणाच्या या बिकट प्रश्नास हात घालणारा दुसरा महापुरुष म्हणजे राजर्षी शाहू छत्रपती ! त्यांच्याजवळ सत्ता होती, साधनसंपत्ती होती आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्यांच्याजवळ शूद्रातिशूद्रांच्या उध्दाराची तळमळ व इच्छाशक्ती होती.

शाहू छत्रपतींना आपल्या प्रजाजनांसाठी उच्च शिक्षणाचे पंचपक्वान्नांचे ताट नको होते, त्यांना त्यांच्यासाठी साधी 'कोंड्याची भाकर' द्यायची होती. 'No cake to a few until all are served with bread' हे त्यांचे तत्त्व होते. या तत्त्वास अनुसरूनच त्यांनी प्राथमिक शिक्षणाचा पुरस्कार केला. एवढेच नव्हे, त्यासाठी त्यांनी आपल्या संस्थानात सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला आणि त्याची कसोशीने अंमलबजावणीही केली.

हिंदुस्थानातील प्रजेला प्राथमिक शिक्षणाशिवाय पर्याय नाही, हे प्रतिपादन करताना शाहू छत्रपतींनी म्हटले आहे–

'शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे, असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत. म्हणूनच सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे.'

म. फुले यांच्याप्रमाणेच राजर्षी शाहू छत्रपती शिक्षण हा आधुनिक काळातील बहुजनांना उध्दारणारा महान तारक मंत्र आहे, असे मानत होते. शिक्षण ही सर्व प्रकारच्या सुधारणांची गुरुकिल्ली आहे, यावर त्यांची नितांत श्रद्धा होती.

तथापि 'शिक्षण' म्हणजे केवळ मुळाक्षरांची तोंडओळख नव्हे; शिक्षणाने माणूस 'शहाणा' झाला पाहिजे, त्याच्या त्याच्या क्षेत्रात 'तज्ज्ञ' व्हायला पाहिजे, असा पुढचा विचार शाहू छत्रपतींनी मांडलेला आहे. ते म्हणतात–

'आम्ही कसे खावे, श्वास कसा घ्यावा, हेही आम्हास शिकले पाहिजे. हे सांगणे जरासे चमत्कारिक दिसते. तथापि ही गोष्ट खरी आहे. हल्लीच्या काळी शेतकी इतकी पद्धतशीर झाली आहे की ज्याला यात यश मिळवायचे आहे, त्याला त्या विषयावरील पुस्तके वाचता आली पाहिजेत व ती समजली पाहिजेत... अर्वाचीन युद्धपद्धतीत शिक्षणाची अत्यंत जरूरी आहे. प्रत्येक सैनिकास संग्रामशास्त्रावरची पुस्तके वाचता आली पाहिजेत. या ठिकाणीसुद्धा शिक्षणाचा प्रश्न आपल्यापुढे येतो. जर मराठे लोकांना शिक्षण मिळेल तर ते खात्रीने चांगले योद्धे होतील. हल्लीच्या लढाईच्या दिवसांत तोफखान्यावरील लोक उत्तम गणिती असले पाहिजेत म्हणून हीच गोष्ट पुन्हा पुन्हा सांगावी लागते; आणि सर्व स्थितीचा विचार करिता एकच तत्त्व निघते ते हे की, प्रत्येक मराठा चांगला सुशिक्षित झाला पाहिजे.'

आमचे स्नेही प्राचार्य रा. तु. भगत यांचा प्रस्तुतचा राजर्षी शाहू छत्रपती : जीवन व शिक्षण कार्य हा ग्रंथ शाहू छत्रपतींचा अशा शिक्षणा विषयक विचारांचा व त्यांच्या कार्याच्या पार्श्वभूमीवर मागोवा घेणारा ग्रंथ आहे.

प्राचार्य भगत हे केवळ अभ्यासक व संशोधक नाहीत, तर 'शिक्षण' या विषयाचे ते तज्ज्ञ आहेत. आणि म्हणूनच ग्रंथारंभीच ते शिक्षणाचा मूळ हेतू कोणता असायला हवा, याचे सुंदर विवेचन करतात. शिक्षण म्हणजे मानवी जीवनशक्तीची प्रेरणा असून त्याची मूळ भूमिका प्रकृतीकडून संस्कृतीकडे जाणारी असते, असे सांगून ते पुढे म्हणतात–

'शिक्षण हे एक साधन आहे, साध्य नव्हे. दु:खाच्या दुष्टचक्रातून सुटका करून घेण्याचे शिक्षण हे प्रभावी साधन आहे. शिक्षण म्हणजे केवळ ज्ञान मिळविणे नव्हे. आपल्या जीवनातील सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून सुटका करून घेणे आणि सर्व लोकांच्या भल्यासाठी उपयोगी पडणारे ज्ञान मिळविणे, यातच खऱ्या शिक्षणाचे महत्त्व सामावलेले आहे. शिक्षणातून शरीर, बुद्धी आणि हृदय यांचा समतोल विकास झाला पाहिजे.'

शिक्षणाविषयीची ही भूमिका नजरेसमोर ठेवून शाहू छत्रपतींच्या शैक्षणिक कार्याचा आढावा व त्याचबरोबर चिकित्सा केली आहे. त्या दृष्टीने त्यांनी लिहिलेले 'शाहू महाराजांचे शिक्षणविषयक विचार' हे प्रकरण वाचकांना उद्‌बोधक ठरेल, यात शंका नाही.

शाहू छत्रपतींच्या शैक्षणिक कार्याचा मागोवा घेताना प्राचार्य भगत यांनी महाराजांनी बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी कोणकोणते उपक्रम राबवले याचे उत्तम दिग्दर्शन यांनी केले आहे. या उपक्रमात मल्लविद्येपासून पुरोहित–विद्येपर्यंतचे सर्व प्रकार आले आहेत.

कोल्हापुरातील 'विद्यार्थ्यांची वसतिगृहे' हा तर शाहू छत्रपतींचा सर्व देशातील एक आदर्श शैक्षणिक प्रयोग होता. त्याचा अभिमानही त्यांना वाटत होता. नाशिकमधील 'श्री उदाजी मराठा विद्यार्थी वसतिगृह' या संस्थेच्या इमारतीची पायाभरणी करीत असता त्यांनी जे भाषण केले आहे, त्यात त्यांनी म्हटले आहे–

'माझ्या चिमुकल्या राज्यातील प्रजाजनांनी एका बाबतीत तरी विशेष नाम कमविले आहे. हे मी अभिमानपूर्वक सांगतो. त्यांचे उदाहरण लोकांपुढे आल्याने हा कित्ता पुष्कळ ठिकाणी गिरविला गेला आहे. ब्रिटिश पार्लमेंटला'मदर ऑफ पार्लमेंट्स' असे मोठ्या अभिमानाने इंग्रज व इतर लोक म्हणतात. त्याप्रमाणे कोल्हापुरास 'मदर ऑफ बोर्डिंग हाऊसेस' म्हणजे विद्यार्थी वसतिगृहांची माता असे सार्थ यश मिळाले आहे.'

प्राचार्य भगत यांनी वसतिगृहांच्या निर्मितीमागील शाहू छत्रपतींची भूमिका विस्ताराने नमूद करून कोल्हापुरातील सर्व वसतिगृहांची माहिती एकत्रित दिली आहे. विशेष म्हणजे काही वसतिगृहांच्या जागांची मूळ कागदपत्रेही दिली आहेत. खरे म्हणजे शाहू छत्रपतींनी स्थापन केलेली वसतिगृहे व त्यांनी आधुनिक महाराष्ट्रातील चार पिढ्यांच्या जडणघडणीत केलेले कार्य हा एक स्वतंत्र संशोधनाचा विषय आहे. या ठिकाणी प्राचार्य भगत यांना मी सुचवू इच्छितो की, त्यांनी उपरोक्त विषयाचा प्रकल्प हाती घ्यावा. ते या विषयास उचित न्याय देऊ शकतील, याची मला खात्री आहे. असाच एक दुसरा उपेक्षित विषय आहे; तो म्हणजे शाहू छत्रपतींचे संस्थानाबाहेरचे शैक्षणिक कार्य. या विषयावर प्रस्तुत ग्रंथात प्राचार्य भगत यांनी लिहिलेले प्रकरण माहितीपूर्ण आहे.